सकाळ

वाना क्र. केएलपी ८ कोल्हापूर, शनिवार, २ जून १९९०



## व्ही.टी.पाटील यांना समाजसेवा पुरस्कार

कोल्हापूर, ता. १- येथील ज्येष्ठ शिक्षण प्रसारक आणि ताराराणी विद्यापीठाचे प्रमुख अर्ध्वयू व्ही. टी. पाटील यांना यंदाचा कर्मवीर भाऊराव समाजसेवा पुरस्कार दक्षिण भारत जैन सभेच्यावतीने जाहीर करण्यात आला आहे. दक्षिण भारत जैन सभा सांगली या संस्थेचे अध्यक्ष बी. बी. पाटील यांनी श्री. व्ही. टी. पाटील यांना समाजसेवा पुरस्कार दिल्याचे पत्र आज दिले. हा पुरस्कार येत्या १७ जूनला सोलापूर येथे समारंभपूर्वक देण्यात येणार आहे.